# प्रत्येक घटकाने 'फिट इंडिया' चळवळीत सहभागी व्हावे

## - कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे आवाहन



शिवाजी विद्यापीठात 'फिट इंडिया' चळवळीच्या प्रारंभानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. प्रल्हाद माने आदी.



शिवाजी विद्यापीठात 'फिट इंडिया' चळवळीच्या प्रारंभानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीत सहभागी झालेले कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. प्रल्हाद माने आदी. रॅलीत मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी, एनएसएस स्वयंसेवक सहभागी झाले.



शिवाजी विद्यापीठात 'फिट इंडिया' चळवळीच्या प्रारंभानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीत सहभागी झालेले कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. डी.के. गायकवाड, डॉ. प्रल्हाद माने आदी. रॅलीत मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी, एनएसएस स्वयंसेवक सहभागी झाले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथे 'फिट इंडिया' मोहिमेचा प्रारंभ केला. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठात करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. डी.के. गायकवाड आदी.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथे 'फिट इंडिया' मोहिमेचा प्रारंभ केला. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठात करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. डी.के. गायकवाड आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोल्हापूर, दि. २९ ऑगस्ट: भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार शिवाजी विद्यापीठाशी संबंधित प्रत्येक घटकाने ‘फिट इंडिया चळवळी’त सहभागी होऊन स्वतःच्या आरोग्य रक्षणाबरोबरच देशाच्या आरोग्याचेही संवर्धन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय खेल दिनाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये ‘फिट इंडिया मूव्हमेंट’ योजनेचा प्रारंभ केला. या कार्यक्रमाचे तसेच पंतप्रधान श्री. मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आज सकाळी करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठ कॅम्पसमध्ये काढण्यात आलेल्या रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंतप्रधान श्री. मोदी यांनी आज ‘फिट इंडिया’ चळवळीचे जनआंदोलनात रुपांतर होण्याची गरज असल्याचे सांगितले. खेळामुळे शरीराची तंदुरुस्ती राहते, हे खरेच असले तरी, फिटनेसचा विस्तार आता खेळांच्याही पुढे जाऊन करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.‘बॉडी फिट तो माईंड हिट’, ‘मैं फिट तो इंडिया फिट’ किंवा ‘देअर आर नो एलिव्हेटर्स टू सक्सेस, यू हॅव टू टेक स्टेअर्स’ अशा पंतप्रधानांच्या वनलायनर्सना विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा जोरदार प्रतिसाद लाभला. त्यांच्या भाषणापूर्वी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांना सुद्धा विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. विशेषतः महाराष्ट्रातील लाठीकाठी, तलवार आणि दांडपट्टा फिरविण्याच्या प्रदर्शनाच्या वेळी तर विद्यार्थ्यांच्या उत्साहाला बहर आला.

त्यानंतर विद्यापीठ परिसरातून सुमारे पाच किलोमीटरची रॅली काढण्यात आली. यामध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह एक हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले.